# राज्यातील हवामान, खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक १०/०८/२०२० अखेरचा अहवाल

**हवामान व पर्जन्यमान** : राज्यात दि.११ ,जून २०२० रोजी मान्सूनचे आगमन झाले. दि.१६ जून ,२०२० पर्यंत मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापला. अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते व बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

कोकण व कोल्हापूर विभागात काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार तर कोंकण विभागात तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाचा पाऊस झाला. नाशिक विभागात तुरळक ठिकाणी जोरदार तर पुणे व नागपूर विभागात तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**पर्जन्यमान (२०२०)**

दि.१ जून ते १० ऑगस्ट कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस ६३०.८ मि.मी. असून दि.१० ऑगस्ट, २०२० पर्यंत ६३५.५ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १००.८ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.१०.०८.२०१९ अखेर ७९७.४ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १२६.४ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि.१ जून ते १० ऑगस्ट, २०२० अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | --- |
| २ | २५ ते ५० % | ० | --- |
| ३ | ५० ते ७५ % | ०४ | रायगड, नंदुरबार, कोल्हापूर, गडचिरोली. |
| ४ | ७५ ते १०० % | १५ | ठाणे, पालघर, नाशिक, पुणे, सातारा, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | १५ | रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, जळगांव, अहमदनगर, सोलापूर, सांगली, औरंगाबाद, जालना, बीड, हिंगोली, परभणी, बुलढाणा, वाशिम, नागपूर. |

राज्यात १० ऑगस्ट, २०२० अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी १२ तालूक्यांत २५ ते ५० %, ४१ तालूक्यात ५० ते ७५ %, १०६ तालूक्यात ७५ ते १००% तर १९६ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**पर्जन्यमान तपशिल (मि.मी) दि.१०.०८.२०२० अखेर**



**किड व रोग-**

राज्यात काही ठिकाणी ज्वारी व मका पिकावर लष्करी अळीचा, भात पिकावर पानावरील ठिपके व पाने करपा या रोगांचा, सोयाबीन पिकावर हेलिकोव्हर्पा, गर्डल बीटल, खोडमाशी, उंट अळी व तंबाखुवरील पाने खाणाऱ्या अळीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, अमेरिकन बोंड अळी, मावा तुडतुडे या किडींचा तर ऊस पिकावर लष्करी अळी व हुमणी या किडीचा प्रादुर्भाव दिसून आला.

किड व रोगाच्या व्यवस्थापनासाठी शेतीशाळा, कृषि विद्यापीठाकडील पिक संरक्षण सल्ले, सर्वेक्षणासाठी योजनांतर्गत फेरोमेन सापळे व ल्युर्सचा पुरवठा,बाधित क्षेत्रास तज्ञांच्या भेटी इत्यादी माध्यमातून उपाययोजना करण्यात येत असून, या अनुषंगाने प्रचार व प्रसिध्दीची कार्यवाही सुरु आहे.

दि.०७.०८.२०२० अखेरच्या प्राथमिक अहवालानुसार जुलै २०२० मधील नैसर्गिक आपत्तीमुळे (अतिवृष्टीमुळे) बुलढाणा, हिंगोली, जळगाव व नागपूर जिल्हयातील अनुक्रमे १४,६०० हे.,१०,०७३ हे., ३०३ हे. व ३१४ हे. असे एकूण-२५,२९० हे. क्षेत्र बाधित झाले असून, यामध्ये ज्वारी, बाजरी, मका, तूर, मूग, उडीद, हळद,सोयाबीन, कापूस, मोसंबी, संत्रा, केळी, भाजीपाला इ. पिकांचा समावेश आहे.

**खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी -**

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४१.९९ लाख हेक्टर असून दि.१० ऑगस्ट, २०२० अखेर १३६.०१ लाख हेक्टर क्षेत्रावर (९५.७९%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५१.३४ लाख हेक्टर असून १३७.२३ लाख हेक्टर क्षेत्रावर (९१%) पेरणी/लागवड झाली आहे. मागील वर्षी दि.०९.०८.२०१९ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील ऊस पिकासह पेरणी क्षेत्र १३१.०६ लाख हे. (८६.६०%) तर ऊस पिक वगळून पेरणी क्षेत्र १३०.१३ लाख हे. (९१.६४%) होते.

**खरीप हंगाम २०२०-२१ पिक परिस्थिती -**

राज्यात खरीप पिकांच्या पेरण्या अंतिम टप्प्यात आहेत. भात पिकाची रोवणी पाऊस समाधानकारक झाल्याने सुरू आहे. भात व बाजरी पिके फुटवे फुटण्याच्या अवस्थेत असून मूग व उडिद पिके वाढ ते फुलोरा अवस्थेत तर काही ठिकाणी शेंगा धरणेच्या अवस्थेत आहेत. सोयाबीन,मका व भुईमूग पिके वाढ ते फुलोरा अवस्थेत तर कापूस पिक वाढ,पाते धरणे तर काही ठिकाणी फुले लागण्याच्या अवस्थेत आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची (निंदणीची/कोळपणीची) कामे सुरू आहेत.

**खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील राज्यस्तरिय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी (दि.१०.०८.२०२० अखेर)**



### खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता




### खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील विभागनिहाय पेरणी क्षेत्राचा तुलनात्मक तक्ता (ऊस पिकासह) (क्षेत्र लाख हे.)




## विभागीय पिक परिस्थिती-

### कोकण विभाग-

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तपमानात व आद्रतेच्या प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाचा पाऊस झाला. तसेच तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाचा पाऊस झाला.

### खरीप हंगाम-२०२०-२१

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.४२ लाख हेक्टर असून दि.१० ऑगस्ट, २०२० अखेर ३.३७ लाख हेक्टर क्षेत्रावर (७६.१७%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप हंगामासाठी भात व नाचणी पिकांची पुर्नलागवडीची कामे पुर्ण होत आली आहेत. भात पिक वाढीच्या ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. नाचणी पिक वाढीच्या अवस्थेत आहे. याशिवाय तूर, मूग, उडीद व इतर तेलबिया पिकांच्या पेरणीची कामे सुरु असून पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत आहेत.

### किड व रोग -

विभागात काही ठिकाणी भात पिकावर निळे भुंगेरे या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**नाशिक विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. हवामान दमट होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २१.१९ लाख हेक्टर असून दि.१० ऑगस्ट, २०२० अखेर १९.४९ लाख हेक्टर क्षेत्रावर (९१.९८%) पेरणी झाली आहे. विभागात भात व नागली रोपवाटिकेतील रोपे लागवडीच्या अवस्थेत आहेत. ज्वारी पिक वाढीच्या अवस्थेत आहे. बाजरी पिक फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. मका, तूर, मूग व उडीद पिके वाढीच्या ते फुलोरा अवस्थेत आहे. सोयाबीन पिक वाढीच्या ते फुलोरा अवस्थेत आहे. बागायती कापूस वाढ ते बोंडे धरण्याच्या अवस्थेत आहे. जिरायत कापूस फुले ते पाते लागण्याच्या अवस्थेत आहे. आडसाली ऊसाची लागवड अंतिम टप्प्यात आहे.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर गर्डल बीटल व खोडमाशीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी व मावा तुडतुडे या किडींचा, मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**पुणे विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.६७ लाख हेक्टर असून दि. १० ऑगस्ट, २०२० अखेर ११.३० लाख हेक्टर क्षेत्रावर (१३०.३४%) पेरणी झाली आहे. विभागात बाजरी पिक वाढीच्या तर काही ठिकाणी पोटरीच्या अवस्थेत आहे. भात पुर्नलागवडीची कामे चालू आहेत. मका, तूर, भुईमूग, सुर्यफुल व कापूस पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. काही ठिकाणी मुग, उडीद व सोयाबीन पिके फुलोरा अवस्थेत आहेत. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू आहेत.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर हेलीकोव्हर्पा, गर्डल बीटल, खोडमाशी व उंट अळी, ऊस पिकावर लष्करी अळी व हुमणी या किडींचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी व मावा तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**कोल्हापूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तपमानात वाढ झाली आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.१४ लाख हेक्टर असून दि. १० ऑगस्ट, २०२० अखेर ७.९४ लाख हेक्टर क्षेत्रावर (९७.५४%) पेरणी झाली आहे. विभागात भात व रागी वगळता इतर पिकांच्या पेरण्या अंतिम टप्प्यात आहेत. दमदार पावसामुळे खोळंबलेली रोप लावणीची कामे गतीने सुरु आहेत. पेर भात पिक वाढ ते फुटव्याच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक वाढीच्या ते पोटरीच्या अवस्थेत आहे. बाजरी पिक फुलोरा अवस्थेत आहे. रागी पिक वाढीच्या ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. तर मूग, उडीद, सोयाबीन व भुईमूग पिके वाढ ते फुलोरा अवस्थेत असून, काही ठिकाणी शेंगा धरण्याच्या अवस्थेत आहेत. नवीन अडसाली ऊसाची लावणी चालू आहे.

गळीतास जाणारा ऊस जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे. पोषक पर्जन्यमान असल्याने ऊसाची वाढ समाधानकारक आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची (कोळपणी/निंदणीची) व खते देण्याची कामे चालू आहेत.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर ऊंट अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**औरंगाबाद विभाग–**

**हवामान**– अहवाल कालावधीत विभागात बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम–२०२०–२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.२३ लाख हेक्टर असून दि. १० ऑगस्ट, २०२० अखेर २०.०३ लाख हेक्टर क्षेत्रावर (९९.००%) पेरणी झाली आहे. विभागात मका, तूर, बाजरी व भुईमूग पिके वाढीच्या ते फुलोरा अवस्थेत आहेत. मूग व उडीद पिके वाढ ते फुलोरा तर काही ठिकाणी शेंगा धरणेच्या अवस्थेत, सोयाबीन पिक वाढ ते फुले लागण्याच्या अवस्थेत तर कापूस पिक वाढ, फांदया फुटणे ते पाते धरणे तर काही ठिकाणी फुले लागण्याच्या अवस्थेत आहे. भुईमूग पिक वाढीच्या अवस्थेत आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू असून पिक संरक्षणासाठी कृषि विभागामार्फत उपायायोजना सुचविण्यात येत आहेत. पिक परिस्थिती समाधानकारक आहे.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर गर्डल बीटल, हेलिकोव्हर्पा व खोडमाशीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, मावा तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**लातूर विभाग–**

**हवामान**– अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. हवा दमट होती. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम–२०२०–२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.९४ लाख हेक्टर असून दि.१० ऑगस्ट, २०२० अखेर २७.८३ लाख हेक्टर क्षेत्रावर (९९.६२%) पेरणी झाली आहे. विभागात ज्वारी, कापूस पिके वाढीच्या अवस्थेत तर तूर, मूग, सोयाबीन पिके वाढीच्या ते फुलोरा अवस्थेत आहेत. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू असून, पिकांची वाढ समाधानकारक आहे.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर पाने खाणारी अळी, उंट अळी, गर्डल बीटल आणि खोडमाशीचा, मका पिकावर लष्करी अळीचा तर कापूस पिकावर मावा तुडतुडे या किडींचा व गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**अमरावती विभाग–**

**हवामान**– अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. दिवस व रात्रीच्या तपमानात घट झाली असून आद्रतेचे प्रमाण वाढले आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३२.१३ लाख हेक्टर असून दि. १० ऑगस्ट, २०२० अखेर २९.६६ लाख हेक्टर क्षेत्रावर (९२.३०%) पेरणी झाली आहे. विभागात कापूस, सोयाबीन, तूर पिके वाढीच्या अवस्थेत आहे. मूग, उडीद पिके फुलोरा ते शेंगा धरण्याच्या अवस्थेत आहे. पिक परिस्थिती समाधानकारक आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू आहेत.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर उंट अळी, गर्डल बीटल व खोडमाशीचा, कापूस पिकावर मावा तुडतुडे,अमेरीकन बोंडअळी,गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**नागपूर विभाग-**

**हवामान** - अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते.तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.२६ लाख हेक्टर असून दि. १० ऑगस्ट, २०२० अखेर १६.३९ लाख हेक्टर क्षेत्रावर (८५.०८%) पेरणी झाली आहे. विभागात भात पिकाची रोवणीची कामे प्रगतीपथावर आहे. कापूस पिक वाढ, पात्या धरणे ते फुले लागण्याच्या तर सोयाबीन व मका वाढ ते फुलोरा अवस्थेत आहे. लागवड झालेला भात वाढीच्या अवस्थेत आहे. कापूस व तूर पिकांमध्ये आंतरमशागतीची (कोळपणी/ निंदणीची) कामे सुरु आहेत.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, मावा तुडतुडे या किडींचा, मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा, भात पिकावर पानावरील ठिपके, पाने करपा या रोगांचा, सोयाबीन पिकावर गर्डल बीटल, तंबाखुवरील पाने खाणारी अळी, उंट अळी, खोडमाशी इत्यादींचा प्रादुर्भाव दिसून आला.

## महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगामातील मुख्य पिकाखालील दि. १०.०८.२०२० पर्यंत पेरणी अहवाल

**क्षेत्र- हेक्टरमध्ये**

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (सन २०१४-१५ ते २०१८-१९) | मागिल वर्षाची पेरणी (दि.०९/०८/२०१९) | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी | +/- प्रत्यक्ष पेरणी क्षेत्राची मागिल वर्षाशी तुलना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भात | १५०३११९ | ९३०१७७ | ११२६४३६ | ७५ | १२१ | २१ |
| २ | खरीप ज्वारी | ४८३२२८ | २७७११० | २६७६६२ | ५५ | ९७ | -३ |
| ३ | बाजरी | ६७१५९४ | ६०३६४६ | ६१४३०९ | ९१ | १०२ | २ |
| ४ | रागी | ९५५१० | ६१६०९ | ५४६६४ | ५७ | ८९ | -११ |
| ५ | मका | ८३८४७५ | ८२३६९५ | ८५३०७५ | १०२ | १०४ | ४ |
| ६ | इतर तृणधान्य | ५२६६५ | २६४३७ | २७२८४ | ५२ | १०३ | ३ |
| **खरीप तृणधान्य** | | **३६४४५९१** | **२७२२६७४** | **२९४३४३१** | **८१** | **१०८** | **८** |
| ७ | तूर | १२७४५७६ | ११८४४४७ | १२१८६०१ | ९६ | १०३ | ३ |
| ८ | मुग | ४८३६२५ | ३१८८६५ | ३८०९०४ | ७९ | ११९ | १९ |
| ९ | उडिद | ३५९१५३ | २८२२२० | ३७३२७० | १०४ | १३२ | ३२ |
| १० | इतर कडधान्य | १००३४९ | ८२७११ | ११३५५१ | ११३ | १३७ | ३७ |
| **एकूण कडधान्य** | | **२२१७७०४** | **१८६८२४४** | **२०८६३२६** | **९४** | **११२** | **१२** |
| **एकूण अन्नधान्य** | | **५८६२२९४** | **४५९०९१७** | **५०२९७५६** | **८६** | **११०** | **१०** |
| ११ | भुईमुग | २०२२९८ | १८७५०७ | १९५६४० | ९७ | १०४ | ४ |
| १२ | तीळ | २३६८६ | ११०१० | ८३२५ | ३५ | ७६ | -२४ |
| १३ | कारळ | १९८२७ | ६३४४ | ५४५० | २७ | ८६ | -१४ |
| १४ | सुर्यफुल | १७९८० | ११५४३ | १४४५८ | ८० | १२५ | २५ |
| १५ | सोयाबीन | ३८८०२४४ | ३८५१६०० | ४१९७४०५ | १०८ | १०९ | ९ |
| १६ | इतर गळीतधान्य | १३८४६ | ४३५४ | ४४७३ | ३२ | १०३ | ३ |
| **एकूण तेलबिया** | | **४१५७८८२** | **४०७२३५७** | **४४२५७५१** | **१०६** | **१०९** | **९** |
| **१७** | **कापूस** | **४१७८४११** | **४३४९८७२** | **४१४५२३९** | **९९** | **९५** | **-५** |
| **एकूण पेरणी क्षेत्र** | | **१४१९८५८८** | **१३०१३१४६** | **१३६००७४६** | **९६** | **१०५** | **५** |
| **१८** | **उस (लागवडीचा)** | **९३५१७९** | **९२८६२** | **१२२०२६** | **१३** | **१३१** | **३१** |
| **एकूण पेरणी क्षेत्र (ऊसासह)** | | **१५१३३७६७** | **१३१०६००७** | **१३७२२७७२** | **९१** | **१०५** | **५** |

टिप- पेरणी क्षेत्र नजर अंदाजीत